रे. मु. क्र. ३३/२०२०
(CNR No. MHAK070014192020)

**: निशाणी २० वर आदेश :**
(पारीत दिनांक ३१ मार्च, २०२१)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा आणि नि.०५ अर्जाच्या दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदरचे दाव्यामध्ये आणि नि.०५ च्या अर्जामध्ये परिच्छेद क्र. २,६ आणि प्रार्थना क्रं.०३ मध्ये गट क्रं. ५६३ असा उल्लेख संगणकिय चुकीमुळे झाला आहे. परंतु वास्तविक पाहता सदर गट क्र. ५३६ असे नमुद करावयास पाहिजे होते. त्यामुळे वादी या अर्जाद्वारे सदरची चुक दुरुस्त करण्याची परवानगी मागत आहे. वादीने पुढे नमुद केले की, वरील चुक ही संगणकिय चुक आहे. त्यामुळे सदर चुक दुरुस्त केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदरचा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता वरील दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, वादीचा अर्ज.

३. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे सादर करुन त्यातील कथने नाकारली व प्रखर विरोध केला. त्यांनी पुढे म्हटले की, वादीने प्रकरण लाबंवण्याच्या उद्देशाने व प्रतिवादीला त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केला आहे. म्हणून वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

४. अभिलेख पाहता सदर चुक संगणकिय चुकीमुळे झालेली दिसते. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुत दाव्यात वादीने मागितलेली नियोजीत दुरूस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नसून उलट वादीचे कथनात स्पष्टता येणार आहे. नियोजित दुरुस्तीमुळे दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सदर नियोजित दुरुस्तीने प्रतिवादी यांच्या बचावाला कोणताही बाधक परिणाम होणार नाही. सबब, सदर नियोजित दुरुस्ती आवश्यक असून वादी सदर दुरुस्ती मंजूर होवून

मिळण्यास पात्र आहे. सबब वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) वादीने दाव्यात आणि नि.०५ वरील अर्जात नियोजित दुरुस्ती तातडीने करुन दुरुस्त दाव्याची व अर्जाची प्रत दाखल करावी.

३) अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : ३१.०३.२०२१. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर.